महाराष्ट्र शासन
# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
राज्य आरोग्य सोसायटी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कार्यालय
आरोग्य भवन, ३ रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी : ०२२-२२७१ ७५०० | ईमेल : mdnrhm.mumbai@gmail.com | www.nrhm.maharashtra.gov.in १६७३८-६४२

## परिपत्रक

जा.क्र. राआसो/पासुविक/परिपत्रक/    /२३
दिनांकः १० मे २०२३

**विषय : पायाभूत सुविधा विकास कक्ष अंतर्गत आरोग्य संस्थांचे दुरूस्ती व नवीन बांधकामे करण्यासाठीच्या कार्यपद्धती व मार्गदर्शक सुचना.**

**संदर्भ** : १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मंजूर टिपणी दि. ०५/११/२०१४.
२) अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. ३०/०१/२०१४ रोजीचे पत्र.
३) आयुक्त, कु.क. व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. ३०/१०/२०१४ रोजीचे पत्र.
४) दि. १०/०३/२०१५ रोजी राज्य सोसायटीच्या कार्यकारी समितीच्या २३ व्या बैठकीमध्ये देण्यात आलेली मंजूरी.
५) दि. २३/०३/२०२३ रोजी राज्य सोसायटीच्या कार्यकारी समितीच्या ३७ व्या बैठकीमध्ये देण्यात आलेली मंजूरी.

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१५ मध्ये आरोग्य संस्थांचे दुरूस्ती व नवीन बांधकामे करण्यासाठी कार्यपद्धती मार्गदर्शक सूचना “कार्यप्रणाली” तयार करण्यात आली होती. कार्यप्रणाली तयार केली त्यावेळेस फक्त ५० लक्ष पर्यंतची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने “ना हरकत” दिल्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पायाभूत सुविधा विकास कक्षामार्फत करण्यात येत होती. सदर कार्यप्रणालीस संदर्भ क्र. ४ अन्वये २३व्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली होती.

त्यानंतर, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पायाभूत सुविधा विकास कक्षाचे (IDW) काम बघता अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र .बीडीजी-२०११/पप्र.क्र.१७०/इमा-३/ दि. १६/०९/२०१५ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आरोग्य संस्थांच्या रुग्णालयाच्या देखभाल व दुरूस्ती तसेच नवीन बांधकामाकरिता असलेल्या आरोग्य संस्थांची रु. ५०.०० लक्ष किमतीपेक्षा जास्त किमतीची दुरूस्ती व देखभाल तथा मूळ नवीन बांधकामे जिल्हा परिषदेकडे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत पायाभूत सुविधा विकास कक्षाकडून (IDW) करून घेण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने “ना हरकत प्रमाणपत्र” दिलेले आहे.

सद्यस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मोठ्या प्रमाणात नवीन बांधकामे मंजूर होतात तसेच इतर योजनांखाली उदा. १५वा वित्त आयोग, प्रधान मंत्री आयुष्यमान भारत इनफ्रास्ट्रक्चर मिशन अंतर्गत देखील बांधकामे मंजूर होत आहेत.या बांधकामांचा खर्च अंदाजे ७.०० ते ४०.०० कोटीच्या घरात आहे. उदा. नवीन माता व बालसंगोपान

केंद्र (रु. ३५.०० कोटी), नवीन ग्रामीण रुग्णालय बांधकाम (रु. २०.०० कोटी), नवीन १०० खाटांचे अतिदक्षता विभाग (CCB) ( रु. ४०.०० कोटी), नवीन ५० खाटांचे अतिदक्षता विभाग (CCB) (रु. २०.०० कोटी) , नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत व कर्मचारी निवासस्थान यांचे बांधकाम (रु. ७.०० कोटी).

ही सर्व कामे करण्यासाठी पायाभूत सुविधा विकास कक्षाच्या कामकाजासाठी एकसूत्रीत कार्यप्रणालीमध्ये काही बदल करणे गरजेचे आहे. मंजूर कार्यप्रणालीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने ३७ व्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सदरील विषय मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार कार्यप्रणाली खालीलप्रमाणे अद्ययावत करण्यात येत आहे.

**मंजूर कार्यप्रणाली :-**

**सनियंत्रण समिती**

| **पदनाम** | **पद** |
|---|---|
| **१) जिल्हा शल्य चिकित्सक** | अध्यक्ष |
| **२) जिल्हा आरोग्य अधिकारी** | सदस्य |
| **३) कार्यकारी अभियंता पासूविक NHM** | सदस्य |
| **४) कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग (मुख्यालय)** | सदस्य |
| **५) उपअभियंता पासूविक NHM** | सदस्य सचिव |

उपरोक्त समिती ही कामाच्या आवश्यकतेनुसार आणि किमान दरमहा प्रस्तावित कामांचा आणि सुरू असलेल्या कामांचा आढावा घेऊन त्यामध्ये गुणवत्ता व प्रगती राखणेकरिता सनियंत्रण करेल.

**अ) अंदाजपत्रकीय स्तर :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रस्तावित कामाचे मेडिकल ऑफिसर, CS, DHO, MS, MO, MO Council, MOH यांच्या मार्फत मागणी घेऊन कामाच्या आवाक्यानुसार कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या राज्य दरसूचीनुसार तयार करावी व सर्व अंदाजपत्रके ही विभागीय कार्यकारी अभियंता यांच्याकडून तपासून त्याच्यावर संबधित संस्थेच्या ईमारत वापरणाऱ्या प्रमुखाकडून साक्षांकीत करून घ्यावी.

तसेच सदरचे Estimate (अंदाजपत्रक) हे त्या त्या खात्याच्या कार्यालय प्रमुख HOD (उदा. CEO ZP/CO Council/DHO/CS) यांच्या मार्फत वित्तीय मर्यादेनुसार राज्य कार्यालयास प्रशासकीय मान्यतेस्तव पाठविण्यात यावी.

**ब) प्रशासकीय मान्यता :-**

उपअभियंता यांनी तयार केलेले अंदाजपत्रकास खालील प्रस्तावित वित्तीय मर्यादेनुसार प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक राहील :-

| अ. क्रं. | पदनाम | विवरण | नवीन वित्तीय अधिकार मर्यादा |
|---|---|---|---|
| A | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | दुरूस्ती कामे | ५ लक्ष पर्यंत |
| | | नवीन बांधकामे | २५ लक्ष पर्यंत |
| B | जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय | दुरूस्ती कामे | ५ लक्ष पर्यंत |
| | | नवीन बांधकामे | २५ लक्ष पर्यंत |
| C | उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ | दुरूस्ती कामे | २५ लक्ष पर्यंत |
| | | नवीन बांधकामे | ५० लक्ष पर्यंत |
| D | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | दुरूस्ती कामे जि.प.स्तर, NHM | १ कोटी पर्यंत |
| | | नवीन बांधकामे जि.प.स्तर, NHM | ५ कोटी पर्यंत |
| E | आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान | राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत PIP मध्ये मंजूर सर्व दुरूस्ती व नवीन बांधकामे | अमर्याद |
| | | केंद्रशासनाकडून अनुदानित इतर कार्यक्रमाअंतर्गत मंजूर बांधकामे | ५ कोटीपर्यंत |
| F | कार्यकारी समिती | केंद्रशासनाकडून अनुदानित इतर कार्यक्रमाअंतर्गत मंजूर बांधकामे | अमर्याद |

**क) तांत्रिक मान्यता :-**

प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक मान्यता खालीलप्रमाणे घ्यावी.

| अ.क्र | पदनाम | विवरण | सध्याची तांत्रिक मान्यता वित्तीय मर्यादा अधिकार | नवीन तांत्रिक मान्यता वित्तीय मर्यादा अधिकार |
|---|---|---|---|---|
| १ | उपअभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष | दुरूस्ती कामे | २ लक्ष | ५ लक्ष पर्यंत |
| | | नवीन बांधकामे | २ लक्ष | ५ लक्ष पर्यंत |
| २ | कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष | दुरूस्ती कामे | १५ लक्ष | २५ लक्ष पर्यंत |
| | | नवीन बांधकामे | २५ लक्ष | ५० लक्ष पर्यंत |
| ३ | अधीक्षक अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष | दुरूस्ती कामे | अमर्याद | २५ कोटी पर्यंत |
| | | नवीन बांधकामे | अमर्याद | ५० कोटी पर्यंत |
| ४ | संबधित) प्रभाग (मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | दुरूस्ती कामे | - | २५ कोटी व त्यावरील अमर्याद |
| | | नवीन बांधकामे | - | ५० कोटी व त्यावरील अमर्याद |

यानुसार अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेऊन अंदाजपत्रके निविदा प्रसिद्धीसाठी संबधित विभागीय कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, आरोग्य सेवा परिमंडळ यांच्याकडे कार्यालय प्रमुखामार्फत सादर करावेत. उपरोक्त प्रमाणे प्रशासकीय/तांत्रिक मान्यता आपल्या मर्यादेत मंजूर करणेसाठी कामाचे तुकडे करण्यात येऊ नये किंवा अंशिक कामाला मान्यता देण्यात येऊ नये. जर असे केल्यास संबंधीतावर सक्त कार्यवाही करण्यात येईल.

ड) निविदा प्रक्रिया :-

तांत्रिक मान्यता प्राप्त झालेल्या मंजूर कामाची निविदा प्रसिद्धी ही mahaTenders.gov.in या Website वर करावी. राज्यस्तरावरून आदर्श प्रारूप निविदा मंजूर करून देण्यात आली आहे. प्रारूप निविदेतील अटी व शर्ती राज्य स्तरावरील मान्यतेशिवाय बदलण्यात येऊ नयेत. निविदेकरिता प्रारूप निविदेला प्रशासकीय मान्यता देण्यास सक्षम अधिकारी स्तरावरून मंजूरी घेण्यात यावी. तसेच E-Tendering System करिता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सर्व उपअभियंता व आरोग्य सेवा मंडळ स्तरावर कार्यकारी अभियंता तसेच राज्य स्तरावर उपअभियंता , कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता , State Finance Officer व सहसंचालक (वित्त व लेखा) यांच्याकडे DSKEY उपलब्ध करून देण्यात येईल. निविदा प्रक्रिया कार्यकारी अभियंता स्तरावरून दि. २२/१०/२०१८ च्या परिपत्रकानुसार संबधित जिल्ह्याच्या उपअभियंता ,कनिष्ठ अभियंता व कार्यक्रम सहायक यांनी करावी. तसेच प्राप्त निविदा तांत्रिक कागदपत्रे सा.बां. विभागाच्या शासन निर्णयास अनुसरून संबधित जिल्ह्याच्या उपअभियंता यांनी पडताळणी/तपासणी करून कार्यकरी अभियंता /समिती समोर मान्यतेस्तव/मार्गदर्शनास्तव सादर करावी. तसेच DSKEY व Tenders प्रक्रिया माहिती करिता NIC शी Support-eProc@nic.in किंवा त्यांच्या पुढील हेल्पलाइन वर संपर्क करावा - ०१२०-४००१००२/००५/०१२०-६२७७७८७.

सर्व निविदा प्रक्रिया/निविदा सूचना व निविदा प्रारूप सा.बां. विभागाच्या दि. २९/०९/२०१८ च्या शासन निर्णयानुसार करावी. तसेच निविदा प्रारूप/निविदा अटी शर्ती सा.बां. वि. वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/मार्गदर्शक सूचनानुसार कराव्यात.

निविदा मंजूरी अधिकार खालीलप्रमाणे समितीस राहतील.

**१) रु. ५० लक्ष पर्यंतची नवीन बांधकामे व २० लक्ष पर्यंतची दुरूस्ती कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ | अध्यक्ष |
| २ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा परिमंडळ | सदस्य |
| ३ | कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य सेवा परिमंडळ | सदस्य (सचिव) |
| ४ | विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य सेवा परिमंडळ | सदस्य |
| ५ | जिल्हा लेखा व्यवस्थापक (संबधित जिल्हा), जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | उपअभियंता (संबधित जिल्हा), पायाभूत सुविधा विकास कक्ष | सदस्य |

सदर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के वा त्यापेक्षा कमी किंवा २० टक्के वा त्यापेक्षा जास्त दराने प्राप्त झाल्यास उपरोक्त समितीनी निविदा मंजुरीसाठी राज्य स्तरावर सहसंचालक (तांत्रिक) यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या समितीला पाठवावी.

**२) रु. २५० लक्ष पर्यंतची नवीन बांधकामे व मंजूर तरतूद असलेली दुरूस्ती कामे (अमर्याद रक्कमेची) कामांसाठी**

| | | |
|---|---|---|
| १ | सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | अध्यक्ष |
| २ | अधीक्षक अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| ३ | सहसंचालक, अर्थ व प्रशासन, आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई | सदस्य |
| ४ | कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, मुंबई | सदस्य (सचिव) |
| ५ | कार्यकारी अभियंता (संबधित परिमंडळ), पायाभूत सुविधा विकास कक्ष | सदस्य |
| ६ | राज्य वित्त व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |

सदर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के वा त्यापेक्षा कमी किंवा २० टक्के वा त्यापेक्षा जास्त दराने प्राप्त झाल्यास उपरोक्त समितीनी निविदा मंजुरीसाठी राज्य स्तरावर आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या समितीला पाठवावी.

**३) रु. २५० लक्ष वरील नवीन बांधकामांसाठी**

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | अध्यक्ष |
| २ | संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| ३ | सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| ४ | अधीक्षक अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य (सचिव) |
| ५ | कार्यकारी अभियंता (संबधित परिमंडळ), पायाभूत सुविधा विकास कक्ष | सदस्य |

इ) कार्यारंभ आदेश :-

निविदा सक्षम स्तरावर मंजूर झाल्यानंतर कार्यारंभ आदेश हे PWD च्या प्रचलित नियमांनुसार कार्यवाही करून (उदा. Security Deposit, Additional Security Deposit, B - १ Agreement यांच्या पूर्ततेनंतर) प्रशासकीय मान्यता देणा-या अधिका-याच्या संमतीने संबधित तांत्रिक मान्यता देणारा अधिकारी कार्यारंभ आदेश निर्गमित करतील. कार्यकारी समितीच्या मान्यतेने प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या निविदांचे कार्यारंभ आदेश आयुक्त, आरोग्य सेवा यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येतील.

फ) बांधकामाची देयके :-

कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी विभागीय कार्यकारी अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम/दुरूस्ती सुरू करून कामाची प्रगती राखणेकरिता करारनाम्यानुसार कामाचे धावते देयक तसेच काम पूर्ण झाल्यानंतर अंतिम देयक देण्यात यावे. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित पद्धतीनुसार कनिष्ठ अभियंता यांनी कामाची मोजमापे १००% नोंदवहीत (Measurement Book) लिहून ती उपअभियंता यांच्या मार्फत १००% तपासून, ५% तपासणी करिता विभागीय कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर करावे. सदर देयके विभागीय कार्यकारी अभियंता यांच्या तपासणीनंतर लेखा शाखेमार्फत तपासून आवश्यक त्या बाबींची कपात करून (उदा. Income Tax, GST, Security Deposit, Royalty Charges, Insurance इ.) काम पूर्णत्वाचे दाखले/ताबा पावती संबंधित वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय अधीक्षक कडून फोटोसहित विहित प्रपत्रात संबंधित विभाग प्रमुखाच्या मार्फत उपअभियंता देयके पारित करणेस्तव जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावीत. दुरूस्ती कामांसाठी, काम पूर्ण झाल्याचा दाखला संबंधित विभाग प्रमुखांकडून प्राप्त करणे, तसेच नवीन बांधकामांसाठी काम पूर्ण झाल्याचा दाखला व ताबा पावती संबंधित विभाग प्रमुखांकडून प्राप्त करणे याची जबाबदारी उपअभियंता यांची राहील. सदर देयके पारित करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना राहतील.

बांधकामावर देखरेख :-

बांधकामांची सध्यस्थितीची अचूक माहिती मिळणेकरिता Construction Tracker Software तयार करण्यात येणार आहे. यामध्ये कामाचे अद्यावत फोटो, बांधकामाची संपूर्ण माहिती अद्ययावत करण्याची जबाबदारी उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांची राहील.

ग) निविदा प्रक्रियासाठी Banking:-

निविदा प्रक्रिया अवलंबण्याकरिता एक स्वतंत्र मंडळस्तर व राज्यस्तरावर बँकेत Saving Account आवश्यक आहे. जेणेकरून निविदा फी भरणे, बँकेत EMD भरणे आणि निविदा प्रक्रिया करण्यासाठी, वर्तमानपत्रीय निविदा

प्रसिद्धी, सर्व प्रकारची Stationary, संनियंत्रण समितीच्या बैठकांचा खर्च, इतर लागणारा किरकोळ खर्च (उदा. Technical Manpower Support, जिल्हास्तरीय संनियंत्रण बैठकीचा खर्च, DTP, Stationary, जाहिरातीचा खर्च इ.) करणे शक्य होईल. राज्यस्तरावरील निविदेकारिता राज्यस्तरावर अधीक्षक अभियंता व संचालक (वित्त व लेखा) यांच्या संयुक्त नावे उघडण्यात आलेल्या Joint Saving Account मधून उपरोक्त खर्च तसेच Tender Process करिता लागणारा सर्व खर्च गरजेनुसार भागविण्यात यावा, तसेच मंडळस्तरावरील निविदेकरिता उपसंचालक व मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्या संयुक्त नावे Saving Account उघडण्यात यावे व Tender Process करिता लागणारा सर्व खर्च Saving Account मधून गरजेनुसार भागविण्यात यावा त्याचा तिमाही अहवाल राज्य कार्यालयास कळविण्यात यावा. सदर बाबतीत Account संबधित निश्चित स्वरूपाची तत्वे ठरविण्यात येतील.

**धीरज कुमार (भा.प्र.से.)** 10/5/23
**आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान,**
**महाराष्ट्र, मुंबई**

**प्रति,**

१) संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई व पुणे
२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (सर्व)
३) अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ (सर्व)
५) सहसंचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई
६) सहसंचालक (तांत्रिक/अतांत्रिक/अर्थ व वित्त), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) उपसंचालक , आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)
९) जिल्हास्तरीय मुख्यालयीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (सर्व)
१०) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
११) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२) विभागीय कार्यकारी अभियंता , आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)
१३) उपअभियंता, पासूविक, जिल्हा परिषद (सर्व)
१४) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परिषद (सर्व)
१५) जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद (सर्व)

प्रत सविनय सादरः

१) मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई
२) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई
३) मा. प्रधान सचिव, नगररचना विभाग, मंत्रालय मुंबई
४) मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई